मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# थकबाकीदारांवर कारवाई सुरुच राहणार

## कराचा भरणा करून जप्तीची कारवाई टाळा : मालमत्ताधारकांना महानगरपालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे दोन दिवस बाकी असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मालमत्ताधारकांना तात्काळ कर भरण्याचे आवाहन केले आहे. त्यासोबतच थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाईस वेग आला असून ज्या मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरला नाही अशा मालमत्तांचे नळकनेक्शन खंडित करण्यात येत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी करसंकलन विभागाने शहरातील १८ विभागीय करसंकलन कार्यालये व कॅश काउंटर्स खुली ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. सकाळी ९.४५ ते रात्री १२ पर्यंत कॅश काउंटर्स खुली असून नागरिकांनी आपला कर भरण्यासाठी पुढाकार घ्यावा




वारंवार आवाहन करूनही थकबाकीदारांनी मालमत्ताकर भरण्याकडे दुर्लक्ष केल्याने ऐन सणासुदीच्या काळामध्ये करसंकलन विभागाला कटू कारवाई करण्याची वेळ आली आहे. आत्तापर्यंत तब्बल १०६९ हून अधिक मालमत्तांवर मालमत्ता जप्तीची कारवाई व जवळपास १०20 मालमत्तांचे नळकनेक्शन खंडित करण्यात आले आहे. त्याबरोबरच ४३४ मालमत्ता लिलावाच्या उंबरठ्यावर असून सदर मालमत्तांचा तात्काळ लिलाव सुद्धा करण्यात येणार आहे. शहरातील थकबाकीदारांना वारंवार आवाहन करूनही ज्या थकबाकीदारांनी अद्यापही थकीत कराचा भरणा केला नाही अशा मालमत्ता कोणत्याही क्षणी जप्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून थकबाकीदारांनी ३१ पूर्वीच आपल्या थकीत कराचा भरणा करून कटू कारवाई टाळावी. असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे.

### कॅश काउंटर्स रात्री 12 पर्यंत खुली राहणार..

» नागरिकांच्या सोयीसाठी करसंकलन विभागाने शहरातील १८ विभागीय करसंकलन कार्यालये व कॅश काउंटर्स खुली ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. सकाळी ९.४५ ते रात्री १२ पर्यंत कॅश काउंटर्स खुली असून नागरिकांनी आपला कर भरण्यासाठी पुढाकार घ्यावा. असे आवाहन सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केले आहे.

> "शहरातील थकबाकीदारांना वारंवार आवाहन करूनही ज्या थकबाकीदारांनी अद्यापही थकीत कराचा भरणा केला नाही अशा मालमत्ता कोणत्याही क्षणी जप्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून आत्तापर्यंत १०६९ मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली असून जवळपास १०२० मालमत्तांचे नळकनेक्शन खंडित करण्यात आले आहे. थकबाकीदारांनी आपल्या कराचा तात्काळ भरणा करून जप्तीची कटू कारवाई टाळावी. ज्यांचा कर थकीत आहे अशांनी तात्काळ कराचा भरणा करावा असे मी आवाहन करतो आहे."
> 
> - प्रदीप जाभंळे – पाटील, अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी – चिंचवड महानगरपालिका

# पवना आणि इंद्रायणी नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी राज्य सरकार कटिबद्ध

## पर्यावरण विभागाने घेतला पवना, इंद्रायणी एसटीपीबाबत आढावा; संवाद बैठकीत पिंपरी-चिंचवड महापालिका, पीएमआरडीए, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचा सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवना आणि इंद्रायणी नदीला प्रदुषणाच्या विळख्यातून सोडवण्यासाठी राज्य शासनाने कंबर कसली आहे. त्यासाठी जादाचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारणी करण्याबाबतचा आढावा राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडून घेण्यात आला. त्याअनुषंगाने पर्यावरण विभागाच्या सचिवांच्या उपस्थितीत व्हीडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीत पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी सहभागी झाले होते. या वेळी तीनही कार्यालयाकडून प्रकल्पाबाबतची सद्यस्थिती ची माहिती घेण्यात आली. पवना आणि इंद्रायणी नदी प्रदुषणाच्या विळख्यात सापडल्याने शहरवासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाला जाग आल्याचे दिसत आहे. या संवाद बैठकीच्या बैठकीचे माध्यमातून जादाचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारणी करण्याबाबतचा आढावा राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडून घेण्यात आला.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून सध्या तीन ठिकाणी एसटीपी प्रकल्प उभारण्यात आले आहेत. त्याची ट्रायल रन घेण्यात येणार आहे. चिखली, बोपखेल आणि पिंपळे निलख या ठिकाणी हे प्रकल्प उभारले जाणार आहेत. तसेच उर्वरीत १०५ एमएलडीचे एसटीपी प्रकल्प ताथवडे, मामुर्डी, किवळे आदीसह विविध ठिकाणी हे प्रकल्प उभारले जाणार आहेत. त्याची माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात दिली.

> पीएमआरडीए पवना नदीपात्रालगत १५ प्रकल्प उभारणार आहे. त्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्यात आला आहे. अद्याप त्याला मंजुरी मिळाली नाही. त्याचा आढावा या बैठकीत मांडण्यात आला.
> 
> - अनिता कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पीएमआरडीए

# वढू व तुळापूर बलीदान स्थळाला तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात येईल : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून वढू येथे समाधी पूजन

**पुणे | प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज यांचे कार्य प्रेरणा देणारे असून पुढील अनेक पिढ्यांना स्फूर्ती आणि ऊर्जा देणाऱ्या त्यांच्या वढू येथील समाधी स्थळ व तुळापूर येथील बलीदान स्थळाला पर्यटन क्षेत्र नव्हे तर तीर्थक्षेत्राचाच दर्जा देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

स्वराज्य रक्षक धर्मवीर संभाजी महाराज यांच्या ३३६ व्या पुण्यतिथी निमित्त वढू बुद्रुक येथे समाधीस्थळी आयोजित संवाद मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी आमदार ज्ञानेश्वर कटके, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, महंत रामगिरी महाराज, पुरुषोत्तम मोरे, माणिक मोरे, अक्षय महाराज भोसले तसेच वढू ग्रामपंचायतीचे पदाधिकारी उपस्थित होते.



### गोहत्या रोखण्यासाठी आणखी कडक कायदा

» वढू गाव हे महाराष्ट्राचे उर्जास्थान आहे. वढू हे स्वराज्य तीर्थ असून या स्वराज्य तीर्थाकडून मिळणारी शक्ती एकवटून महाराष्ट्राला प्रगती पथावर घेऊन जायचे आहे, असे सांगून गोमातेला राज्यमातेचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. गोशाळेला अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. आवश्यकता असल्यास गोहत्या रोखण्यासाठी आणखी कडक कायदा करण्यात येईल. गोरक्षकांचे काम करणाऱ्यांना संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे ते म्हणाले. तसेच ग्रामस्थांच्या मागणीनुसार दरवर्षी आजच्या बलिदान दिनानिमित्त स्थानिक सुट्टी जाहीर करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महाराष्ट्र ही साधू-संतांची, वीरांची भूमी आहे. छत्रपती संभाजी महाराज हे देव, देश आणि धर्मासाठी लढणारे राजे होते. त्यांच्या स्मृती स्थळाच्या विकासासाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विकास कामे करताना पावित्र्य कमी होणार नाही, याची काळजी घ्यावी. दोन्ही स्थळांचा राज्याच्या लौकिकाला साजेसा विकास करण्यात येईल. या कामाला गती देऊन दर्जेदार कामे करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असल्याचे सांगून वढू व तुळापूरच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

### उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार

» यावेळी महंत रामगिरी व आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी आपले विचार मांडले. उपमुख्यमंत्री उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते महंत रामगिरी महाराज यांना धर्मवीर संभाजी महाराज पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात आला. तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात धर्म रक्षणासाठी काम करणाऱ्या व्यक्तींना शंभूसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आले

ते म्हणाले, राज्य शासन हे लोककल्याणकारी आहे. छत्रपती शिवाजी व छत्रपती संभाजी महाराज यांच्या आदर्शावर चालणारे हे सरकार असून जनकल्याणाचा संकल्प शासनाने केला आहे. गेल्या अडीच वर्षात राज्यात अनेक विकास प्रकल्प आणि लोकाभिमुख कल्याणकारी योजना राबविल्या. तीर्थक्षेत्र, गडकोट किल्ले यांच्या विकासाला प्राधान्य दिले. गडकोट किल्ले हे आपले धरोहर आहेत. गडकोट किल्ल्यांवरील अतिक्रमण प्राधान्याने काढण्यात येईल. गड-किल्ल्यांचे पावित्र्य जपणे ही सर्वांची जबाबदारी आहे. ते म्हणाले, मुंबईतील सागरी मार्गाला धर्मरक्षक संभाजी महाराजांचे नाव देण्यात आले आहे. छत्रपती संभाजी महाराजांची जयंती गेट वे ऑफ इथे साजरी करण्यात आली, ही अभिमानाची बाब आहे.

प्रारंभी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते समाधीचे पूजन करण्यात आले. तसेच शासनाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार महेश लांडगे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाला ग्रामस्थ तसेच शंभुप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुरंदर विमानतळाच्या जागेच्या भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करा : पी. वेलरासू

## विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित पुरंदर विमानतळाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. पुरंदर येथील छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रस्तावित जागेच्या भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करुन विमानतळाचे काम सुरु करावे, अशा सूचना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू यांनी केल्या.



विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित पुरंदर विमानतळाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी तसेच जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, बारामती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी, पुरंदरचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, उपअधीक्षक भूमी अभिलेख,महापारेषण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पी. वेलरासू म्हणाले, पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी २८३२ हे.आर. क्षेत्राचे भूसंपादन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार शासनाने मान्यता दिली आहे. मोजणीसाठी लागणारे शुल्क ४.८० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. भूसंपादन प्रक्रियेत येणाऱ्या अडीअडचणी सोडवण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पूर्णपणे सहकार्य करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

### विभागीय आयुक्त यांच्या सूचना

» भूसंपादन प्रक्रियेचे तात्काळ नियोजन करुन अचूक व पारदर्शकपणे प्रक्रिया पूर्ण करावी, नियोजित क्षेत्रासाठी प्रस्तावित केलेल्या गावांतील ७/१२ अद्ययावत असल्याची तसेच मोजणीमध्ये असलेल्या वस्तुस्थितीनुसार ७/१२ असल्याची, त्या गावांतील पीक पाहणी झाली असल्याची खात्री करा, ड्रोन सर्व्हेक्षण करा, जिल्हाधिकारी यांच्या नियोजित गावांमध्ये बैठका झाल्यानंतर नोटीस पाठवून मोजणीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन करा, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिल्या.

९ एप्रिल पासून ड्रोन सर्व्हेक्षणाला सुरुवात करावी, मोजणीपूर्वी गावकऱ्यांना पूर्वकल्पना द्यावी, असे जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले. बैठकीत अधिसूचना प्रसिद्धी, ड्रोन सर्वेक्षण, मोजणी शुल्क, शासकीय जमीन वर्ग करणे, चर्चेने दर ठरविणे व निवाडा, चर्चा फिस्कटल्यास सक्तीचे भूसंपादन व निवाडा करणे, सरकारी क्षेत्र व वनक्षेत्र महामंडळास हस्तांतरीत करणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, भूमी अभिलेख व पोलीस विभाग यांनी मौजे वनपुरी, कुंभारवळण, उदाचीवाडी, एखतपुर, मुंजवडी, खानवडी व पारगाव या ७ गावांतील संयुक्त मोजणी पूर्ण करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

# लाखो कर्मचारी आरोग्य सुविधांपासून वंचित

## कर्मचारी राज्य विमा योजनेचे 60 टक्के कामगारांकडे नोंदणी कार्ड नाही, सुमारे 3 लाख कामगार महत्त्वाच्या आरोग्यविषय सुविधापासून वंचित

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड ही उद्योगनगरी म्हणून देशाच्या कानाकोपऱ्यात प्रसिद्ध आहे. कर्मचारी राज्य विमा योजने अंतर्गत कामगारांची संख्या पाच लाख आहे. असे असले तरी केवळ ४० टक्के कर्मचाऱ्यांची कर्मचारी राज्य विमा योजनेअंतर्गत नोंदणी झाली असल्यामुळे आणि ६० टक्के कामगार नोंदणीपासून वंचित राहिल्यामुळे सुमारे ३ लाख कामगारांना महत्त्वाच्या आरोग्यविषय सुविधापासून वंचित राहावे लागत आहे.

मोहन नगर पिंपरी-चिंचवड येथे कर्मचारी राज्य विमा योजनेचे १०० खाटाचे रुग्णालय आहे. याठिकाणी सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यामध्ये अस्थिरोग, मूत्रविकार, त्वचा, मानसोपचार, स्त्रीरोग, कान, नाक, घसा, डोळे, दंत चिकित्सा हे उपचार केले जातात. तसेच जे उपचार येथे उपलब्ध नाहीत ते उपचार यशवंतराव चव्हाण, ससून रुग्णालयात करण्यात येतात. किंवा राज्य विमा योजनेच्या संलग्न असलेल्या आदित्य बिर्ला रुग्णालय, चिंचवड, पवना, स्पर्श, पायोनियर, अथर्व रुग्णालय सोमाटणे फाटा येथे उपचार करण्यात येतात. कर्मचारी राज्य विमा योजनेच्या केवळ शंभर खाटा असणाऱ्या रुग्णालयात फक्त सरासरी ५०० रुग्णांचा बाह्य रुग्ण विभाग सुरू आहे.



### स्वहिसा भरण्यास टाळाटाळ

» ठेकेदारांकडून विविध कारखाने, विविध खासगी क्षेत्रात कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या कामगारांच्याकडून कर्मचारी राज्य विमा योजनेसाठी लागणारा निधी पगारातून कट केला जातो. तर संबंधित कारखाने, आस्थापनांकडून ३.२५ टक्के रक्कम भरणे आवश्यक आहे. मात्र संबंधितांकडून ती रक्कम भरली जात नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना कार्ड मिळण्यास विलंब होत आहे.

**रुग्णालय प्रशासनाला दिला जात नाही वेळ**

कर्मचारी राज्य विमा निगम अंतर्गत येण्याऱ्या रुग्णालयाच्या सुविधा मिळवायच्या असतील तर त्यासाठी कर्मचारी राज्य विमा योजने असणे आवश्यक आहे. पाच लाख कर्मचारी यापैकी फक्त चाळीस टक्के कर्मचाऱ्यांकडेच कार्ड आहेत. इतर कर्मचाऱ्यांना ही त्याचा लाभ देण्यासाठी व त्याअनुषंगाने त्यांच्यात जागृती करण्यासाठी राज्य कामगार विमा निगम रुग्णालय प्रशासन वेळ मागत आहे. परंतु तो वेळ आणि परवानगी देण्यात विविध कारखाने व इतर आस्थापना दिरंगाई करत असल्याचे दिसून येत आहे.

### तीन लाख कामगार वंचित

» कर्मचारी राज्य विमा योजनेच्या रुग्णालये द्वारे देण्यात येणाऱ्या सुविधा पासून जवळपास तीन लाख कर्मचारी वंचित असल्याचे समजते. ते ज्या ठिकाणी काम करत आहेत तेथे संबंधित ठेकेदार हे त्यांच्या कर्मचारी राज्य विमा योजने पोटी स्वहिसा भरताना हात आखडता घेत आहेत. त्यामुळे संबंधित कर्मचारी आणि त्यांच्यावर अवलंबून असणारे त्यांची पत्नी,पती, आई वडील आणि मुले असे लाखो जणांना या सुविधा मिळण्यास अडचण निर्माण होतात.

“ कर्मचारी राज्य विमा योजनेचे नोंदणी कार्ड देण्यास टाळाटाळ करण्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. कार्ड न देण्यामागे संबंधित आस्थापनच जबाबदार आहेत. अशा आस्थापनेवर कडक कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच जे ठेकेदार कामगारांकडून कर्मचारी राज्य विमा योजने पोटी रक्कम कपात करता मात्र स्वहिसा भरण्यास टाळाटाळ करतात त्यांच्यावर ही कारवाई होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रदेश भाजप कामगार आघाडी राज्य सरकारकडे पाठ पुरावा करत आहे.

**- हनुमंत लांडगे, सरचिटणीस, प्रदेश कामगार आघाडी, भाजप**

# होर्डिंग्जच्या उदासीनतेमुळे पालिकेच्या उत्पन्नात घट

## नुतनीकरण रखडले, महापालिकेकडे 977 होर्डिंग्जची नोंद, अधिकृत होर्डिंगधारकांकडून करउत्पन्न बुडाले

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत परवानाधारक अधिकृत एकूण ९७७ जाहिरात होर्डिंग्स आहेत. या होर्डिंग्सचा परवाना नूतनीकरणाचे काम रखडले आहे. होर्डिंग्स कोसळून अनेकांचा मृत्यू झाल्यानंतरही महापालिकेची ही उदासीनता समोर येत आहे. त्यामुळे अधिकृत होर्डिंग्सधारकांना नुतनीकरण होत नसल्याने नियमांचे उल्लंघन होत असून महापालिकेच्या उत्पन्नात घट होत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेच्या जागेत जाहिरात होर्डिंग्स उभारले जातात. तसेच, खासगी जागा मालकांना जाहिरात होर्डिंग्स उभारण्यास परवानगी दिली जाते. त्यातून आकाशचिन्ह परवाना विभागाला उत्पन्न मिळते. अनधिकृतपणे होर्डिंग्स उभारून जाहिरातदार महापालिकेचे उत्पन्न बुडवतात, तसेच परवाना घेतल्यानंरही शुल्क भरले जात नाही. त्यात किवळेमध्ये घडलेल्या होर्डिंग्स दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर शहरातील सर्वच जाहिरात होर्डिंग्सचे स्ट्रक्चरल ऑडिट केले. त्यानंतरही शहरात होर्डिंग्स परवाना नूतनीकरणाची प्रक्रिया वेळेवर होत नाही.

होर्डिंग्स परवाना नूतनीकरण वेळेवर होत नसल्यामुळे होर्डिंग्सधारकांकडून त्याचा गैरफायदा घेतला जात आहे. कोणाचे लक्ष नसल्यामुळे सर्रास परवान्यापेक्षा वाढीव आकाराचे होर्डिंग्स लावले जातात. एकाच बाजूने परवाना असताना दोन्ही बाजूने जाहिराती लावल्या जातात. शहरात मोठी होर्डिंग्स दुर्घटना घडल्यानंतर, तसेच न्यायालयाकडून सातत्याने ताशेरे ओढले जातात, तरीही महापालिका प्रशासनाला त्याचे गांभीर्य नाही.

दरम्यान, आकाशचिन्ह व परवाना विभागाला २०२-२३ या आर्थिक वर्षात एकूण १७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. त्या पूर्वीच्या २०२१-२२ वर्षाच्या

तुलनेत हे उत्पन्न पाच कोटींनी वाढले होते. तर, २०२३-२४ या आर्थिक वर्षात १९ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले होते. चालू आर्थिक वर्षात २५ कोटी

रुपयांचे उद्दिष्ट असताना आजअखेर १६ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. त्यामुळे अधिकृत होर्डिग परवानाधारकांचे नुतनीकरण रखडले असून महापालिकेच्या उत्पन्नात घट होवू लागली आहे.



### जाहिरातबाजीसाठी दबाव

» अधिकृत होर्डिंग्सधारकांकडून फुकट जाहिराती लावून घेण्यासाठी आणि स्वतःच्या, तसेच कार्यकर्त्यांच्या अनधिकृत फ्लेक्स, बॅनर्स अशा जाहिरातींवर कारवाई न करण्यासाठी काही राजकीय मंडळी दबाव आणतात. गेल्या वर्षभरात या विभागात तीन अधिकारी बदलले आहेत. एककीडे राजकीय दबावामुळे अधिकारी व कर्मचारी जेरीस आले आहेत. त्याचा परिणाम विभागाच्या दैनंदिन कामकाजावर होत आहे.

# नंबर प्लेटची सुरक्षा रामभरोसे

**'एचएसआरपी' तयार झाल्यानंतर त्याच वाहनाला बसवणे बंधनकारक; मात्र कोणतीही तपासणी न करता थेट दिली जात आहे**

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांसाठी 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' (हाय सेक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. येत्या ३० जूनपूर्वी 'एचएसआरपी' न बसवल्यास दंड आकारण्यात येणार आहे. त्यामुळे नवीन नंबर प्लेट बसवून घेण्यासाठी नागरिकांनी धावपळ उडाली आहे. संबंधित नंबर प्लेट तयार झाल्यानंतर ती हस्तांतरित न करता सेंटरवर चासी किंवा आरसी बुक तपासून त्याच वाहनाला बसविणे बंधनकारक आहे. असे असतानाही सेंटरचालकांकडून या नियमाला हरताळ फासला जात असून वाहनाची कोणतीही चौकशी न करता नंबर सांगितल्यानंतर नंबर प्लेट थेट हातात दिली जात असल्याचा गंभीर आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

येत्या ३० जूनपर्यंत वाहनधारकांना 'हाय सेक्युरिटी नंबर प्लेट' बसवून घेणे अनिवार्य आहे. त्यासाठी राज्यभरात तीन खासगी एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. पुण्यात रोझमार्टा ही एजन्सी काम करीत आहे. या एजन्सीची शहरात १२४ केंद्रे आहेत. या केंद्रांच्या संख्येत वाढ केली जाणार नाही. ज्या नागरिकांकडून नंबर प्लेट बसवण्यासाठी या केंद्रांत बुकिंग केली होती, त्या वाहनधारकांना कंपनीकडून फोन केला जातो. तसेच वाहनधारकांना जवळच्या केंद्रात त्यांच्या सोईच्या वेळेत नंबर प्लेट बसविण्यासाठी बोलावले जाते.

ही नंबर प्लेट त्या वाहनाला बसवणे बंधनकारक आहे. परंतु या सेंटरचालकांकडून कोणतीही शाहनिशा न करता तसेच वाहनाचा मालक कोण आहे, याची कोणतीही चौकशी न करता थेट केवळ नंबर प्लेटचा नंबर सांगितल्यानंतर हातात दिली जात आहे. यामुळे 'एचएसआरपी'च्या सुरक्षिततेच्या मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.




### सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर

» प्रादेशिक परिवहन विभागाच्या (आरटीओ) निर्देशानुसार शहरातील २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांना आधुनिक तंत्रज्ञानयुक्त 'एचएसआरपी' बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. ३० जूनपूर्वी 'एचएसआरपी' बसवावी लागणार आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज करावा लागणार आहे. मात्र सायबर चोरट्यांनी ही बाब हेरून काही बनावट संकेतस्थळ तयार करून फसवणूक केल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात आल्या होत्या. त्यानंतर आता नंबर प्लेट देताना कोणतीही काळजी घेतली जात नसल्याची गंभीर बाब 'सीविक मिरर'ला नागरिकांनी सांगितली. यामुळे आरटीओ कार्यालयाने तसेच पोलिसांनी यामध्ये लक्ष घालून संबंधित सेंटर चालकांना समज देवून गाडीच्या चासीची तपासणी केल्याशिवाय नंबर प्लेट कोणाच्याही हातात देऊ नये. तसेच ती त्याचा गाडीला बसवून द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### एजन्सीच्या सेंटरचालकांकडून हलगर्जीपणा

» संबंधित नंबर प्लेट तयार झाल्यानंतर ती हस्तांतरित न करता सेंटरवर चासी किंवा आरसी बुक तपासून त्याच वाहनाला बसविणे बंधनकारक आहे. असे असतानाही सेंटरचालकांकडून या नियमाला हरताळ फासला जात असून वाहनाची कोणतीही चौकशी न करता नंबर सांगितल्यानंतर नंबर प्लेट थेट हातात दिली जात असल्याचा गंभीर आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

> नियमानुसार 'एचएसआरपी' नंबर प्लेट वाहनाची चासी किंवा आरसी बुक पाहिल्यानंतर सेंटरचालकांनी त्या गाडीला बसवून देणे बंधनकारक आहे. कोणताही सेंटरचालक वाहनचालकाच्या थेट हातात नंबर प्लेट देऊ शकत नाही. असा प्रकार होत असेल त्यावर योग्य ती कारवाई केली जाईल. ऑनलाईन बुकिंग करताना गाडीची संपूर्ण माहिती दिलेली असते. त्यामुळे नंबर प्लेट लावताना गाडीवर चासीचा नंबर किंवा आरसी बुक बघूनच ती बसविण्यात यावी.
>
> - स्वप्नील भोसले, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

# उन्हाच्या तडाख्याने राजगडावर पाणीटंचाई,पर्यटक घटले

**राज्यभरात उन्हाचा कहर वाढला असून, तापमान 40 अंशांपार गेलं आहे. आजारपणं वाढली असून, अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवत आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यभरात उन्हाचा कहर वाढला असून, तापमान 40 अंशांपार गेलं आहे. आजारपणं वाढली असून, अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवत आहे. राजगड तालुक्यातही उष्णता वाढली असून, छोटे-मोठे आजार डोकं वर काढत आहेत. तालुक्यात भीषण पाणीटंचाई नसली तरी किल्ल्यांवर पाणी कमी पडत आहे. यामुळे पर्यटकांची संख्या 70 टक्क्यांनी घटली असून, स्थानिक व्यावसायिकांचं नुकसान झालं आहे. स्थानिकांचं म्हणणं आहे की, पद्मावती तलाव आणि सदरेमागील तलावाचं पाणी शुद्धीकरण प्रकल्पाने वापरलं तर पर्यटकांना सोय होईल.

जंगलात पाणीटंचाईमुळे प्राणी गावाकडे येत आहेत. राजगड आणि तोरणा किल्ल्यांवर पाणी आणि अन्नाचा तुटवडा जाणवत असून, माकडांना त्याचा फटका बसला आहे. पर्यटक कमी झाल्याने पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी बापू साबळे स्वखर्चाने माकडांसाठी खाद्य टाकत आहेत.

राजगडावर तीन माच्या आणि बालेकिल्ल्यासह अनेक पाण्याची टाकी आहेत. पद्मावती माचीवरील तलाव मोठा असला तरी त्याचं पाणी पिण्यासाठी वापरलं जात नाही. इतर टाक्यांमधील पाणी आटत चाललं आहे, ज्यामुळे पर्यटक कमी झाले आहेत. स्थानिकांचं म्हणणं आहे की, पद्मावती तलाव आणि सदरेमागील तलावाचं पाणी शुद्धीकरण प्रकल्पाने वापरलं तर पर्यटकांना सोय होईल.

तालुक्यात भीषण पाणीटंचाई नसली तरी किल्ल्यांवर पाणी कमी पडत आहे. यामुळे पर्यटकांची संख्या घटली असून, स्थानिक व्यावसायिकांचं नुकसान झालं आहे. जंगलात पाणीटंचाईमुळे प्राणी गावाकडे येत आहेत. राजगड आणि तोरणा किल्ल्यांवर पाणी आणि अन्नाचा तुटवडा जाणवत आहे.



> "राजगडावरील माकडांशी माझं नातं जुळलं आहे. पर्यटक खाद्य टाकतात, पण आता ते कमी झाले. उन्हाळ्यात जंगलात अन्न मिळणं कठीण झालं आहे. कैऱ्यांचं उत्पन्नही कमी आहे आणि प्राण्यांची संख्या वाढली आहे. म्हणून मी रोज स्वखर्चाने खाद्य टाकतो. माकडं माझ्याकडे धावत येतात, त्याचं समाधान वाटतं."
>
> - बापू साबळे, कर्मचारी, पुरातत्त्व विभाग, पुणे

> "सौरऊर्जेचा वापर करून पद्मावती तलाव, सदरेमागील तलाव आणि चंद्रकोर टाक्यावर शुद्धीकरण प्रकल्प झाला तर पाणीटंचाई टळेल. छोटी-मोठी टाकी स्वच्छ करून पावसाचं पाणी साठवलं तर वर्षभर पुरेल. पुरातत्त्व विभागाने कमी खर्चात विकास आराखडा बनवावा."
>
> - ॲड. विजय थोपटे, पर्यटक, पुणे